RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ८, अंक ८८] गुरुवार, डिसेंबर २९, २०२२/पौष ८, शके १९४४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक १५५**

**प्राधिकृत प्रकाशन**

### शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

**सूचना**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६० च्या उप-कलम (२) नुसार

**नगररचना परीयोजना क्रमांक १० (टीपीएस-१०)**

क्रमांक सिडको / नैना/ मु.नि./ न.र.प.-१०/२०२२/५९७

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम, १९६६ (महा. अधिनियम XXXVII, १९६६) (येथून पुढे उक्त अधिनियम असे निर्देशित करण्यात येईल), च्या कलम ४० च्या उप-कलम (१) मधील खंड (ब) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग (नविवि) ने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/४७५/ प्र.क्र.-९८/१२/नवि-१२, दिनांक १० जानेवारी २०१३ व वेळोवेळी झालेल्या सुधारणा अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे, नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना), (येथून पुढे उक्त क्षेत्र असे निर्देशित करण्यात येईल) साठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) (येथून पुढे महामंडळ असे निर्देशित करण्यात येईल) म्हणजे सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण (येथून पुढे वि.नि.प्रा.असे निर्देशित करण्यात येईल) म्हणून नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस-१२१५/२४५/ प्र.क्र.-३३२/२०१६/एस.एम./यूडी -१२, दिनांक २७ एप्रिल २०१७ नुसार नैनातील २३ गावांसाठी अंतरिम विकास आराखडा मंजूर केला आहे, आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२१५/ २४५/प्र.क्र. ३३२/१६/ई.पी./नवि-१२, दिनांक १ मार्च २०१९ अन्वये अधिनियमाच्या कलम ३१ च्या उप-कलम (१) नुसार अंतरिम विकास आराखड्याचा वगळलेले भाग मंजूर केले आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस-१७१७/ एमआयएस २७५०/सीआर-९१ /२०१९/यूडी-१२, दिनांक १६ सप्टेंबर २०१९ नुसार नैनातील १५१ गावांसाठी विकास आराखडा मंजूर केला आहे आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२२१/१०४१/ प्र.क्र. ७१/२१/नवि-१२, दिनांक २४ जून २०२२ अन्वये अधिनियमाच्या कलम ३१ च्या उप-कलम (१) नुसार विकास आराखड्याचा वगळलेले भाग अंशतः मंजूर केले आहे ;

आणि ज्याअर्थी सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र. १२३०७, दिनांक ३ मार्च २०२० अन्वये पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील शिवकर, चिखले, कोळखे, कोन आणि डेरवली यांच्या काही भागात नगररचना परीयोजना क्रमांक १० (येथून पुढे

टीपीएस-१० असे निर्देशित करण्यात येईल) करण्याकरिता, उक्त अधिनियमातील कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार त्याचा उद्देश घोषित केला आहे. आणि उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उप-कलम (२) मध्ये नमूद तरतुदीनुसार टीपीएस-१० करण्याच्या उद्देशाची घोषणा दिनांक १८ मार्च २०२० रोजीच्या असाधारण अधिकृत **महाराष्ट्र शासकीय राजपत्रात** (भाग -२) आणि स्थानिक वृत्तपत्र "द फ्री प्रेस जर्नल" आणि "आपले महानगर" यांत दिनांक २ एप्रिल २०२० रोजी प्रकाशित करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन रचना (सुधारणा) अधिनियम, २०२० (सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १९) द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १४८(अ) मधील सुधारित तरतुदीनुसार, अधिनियमातील प्रकरणे दोन, तीन, चार व पाच मधील तरतुदीप्रमाणे, कोणत्याही विकास योजना, प्रादेशिक योजना किंवा योजनांसाठीचा कालावधी विचारात घेताना, देशामध्ये किंवा राज्यामध्ये उद्भवणाऱ्या कोणत्याही महामारीच्या किंवा साथीच्यारोगाच्या फैलावास किंवा आपत्ती जन्य परिस्थितीस प्रतिबंध करण्याकरिता, भारत सरकारने किंवा, यथास्थिती, राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक तत्त्वांच्या किंवा टाळेबंदी उपाययोजनांच्या अंमलबजावणीमुळे, उक्त प्रकरणानुसारची कोणतीही कार्यवाही पूर्ण होऊ शकली नसेल तर, असा कालावधी वगळणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विहित कालावधी, महाराष्ट्र राज्यात दिनांक २३ मार्च २०२० रोजी पासून कोव्हीड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे जाहीर केलेला टाळेबंदीचा कालावधी वगळता अस्तित्वात आहे ;

आणि ज्याअर्थी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी, सिडको संचालक मंडळाच्या दिनांक २ एप्रिल २०२२ रोजीच्या ठराव क्र. १२५५१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून क्र. सिडको/नैना/२०२२/ E-५६२२५ द्वारे दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी घोषित केलेल्या नगररचना परीयोजना क्रमांक १० मध्ये रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील कोळखे, कोळखे पेठ, कोन, डेरवली आणि पळस्पे गावांच्या काही भागाच्या समावेशासाठी उक्त अधिनियमातील कलम ६२ नुसार मंजुरी दिली आणि उक्त अधिनियमातील कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार सदर भागात, नगररचना परीयोजना करण्याच्या उद्देशाची घोषणा दिनांक २५ ते ३१ ऑगस्ट २०२२ रोजीच्या अधिकृत **महाराष्ट्र शासन राजपत्र** (भाग -२) आणि स्थानिक वृत्तपत्र 'फ्री प्रेस जर्नल' आणि 'दैनिक किल्ले रायगड' यांत इंग्रजी व मराठी भाषेत दिनांक २ सप्टेंबर २०२२ रोजी प्रकाशित करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ या कायद्या अंतर्गत यापूर्वी कोव्हीड-१९ बाबत लावण्यात आलेले सर्व निर्बंध हे दिनांक १ एप्रिल २०२२ पासून मागे घेण्यात आले आहेत;

आणि ज्याअर्थी, टीपीएस-१० तयार करण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत राजपत्र क्रमांक सिडको/ नैना/मु.नि./ टी.पी. एस.-१०/२०२० अन्वये दिनांक १८ मार्च २०२० रोजी व क्र. सिडको/ नैना/ मु.नि./ टीपीएस-१०/ २०२२/५१५ अन्वये दिनांक २५ ते ३१ ऑगस्ट २०२२ रोजी प्रसिद्ध झालेल्या घोषणा व्यपगत झाल्या आहेत आणि अशा घोषणा कोणत्याही प्रकारे व्यपगत झाल्यास नियोजन प्राधिकरणास त्याच क्षेत्राच्या संदर्भात कोणत्याही वेळी नवीन घोषणा करण्यास उक्त अधिनियमातील कलम ६१ च्या पोट-कलम (२) नुसार प्रतिरोध असणार नाही.

आता म्हणून, सिडको संचालक मंडळाने, प्रारूप परियोजना तयार करणेकरिता पुरेसा कालावधी उपलब्ध नसल्याची दखल घेऊन उक्त अधिनियमाच्या कलम ६१ च्या पोट-कलम (२) अन्वये आहे तेच सीमाक्षेत्र कायम ठेऊन नव्याने नगररचना परीयोजना क्रमांक १० तयार करण्याचा उद्देश घोषित करण्यास संचालक मंडळाच्या दिनांक ९ डिसेंबर २०२२ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. १२६२९ अन्वये मान्यता दिली व त्यासोबतच कलम ६० च्या पोट-कलम (१) अन्वये रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील मौजे शिवकर, चिखले, कोळखे, कोळखे पेठ, कोन, डेरवली आणि पळस्पे गावांच्या काही भागात नगररचना परीयोजना क्रमांक १० करण्याचा इरादा घोषित केला आहे.

आता, म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उप-कलम (२) द्वारा प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महामंडळ याद्वारे नकाशात दर्शविल्याप्रमाणे गुलाबी रंगाच्या सीमेत समाविष्ट क्षेत्रातील सर्व गावांच्या काही भागात म्हणजेच रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील मौजे शिवकर, चिखले, कोळखे, कोळखे पेठ, कोन, डेरवली आणि पळस्पे येथे नगररचना परीयोजना क्रमांक १० करण्याचा इरादा घोषित करत आहे.

प्रस्तावित टीपीएस नं. १० मध्ये नकाशात दर्शविल्याप्रमाणे गुलाबी रंगाच्या सीमेत समाविष्ट क्षेत्रातील सर्व गावांच्या काही भागात म्हणजेच रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील मौजे शिवकर, चिखले, कोळखे, कोळखे पेठ, कोन, डेरवली आणि पळस्पे गावांच्या जमिनीवर सक्षम प्राधिकरणाकडून वैध बांधकाम परवानगी मिळाली असल्यास अशा परवानगीचा तपशील नैना कार्यालयाकडे सादर

करण्याची जमीन मालकांना विनंती करण्यात येत आहे. योजनेत सहभागी असलेल्या जमीन मालकांची संयुक्तीकपणे किंवा वैयक्तिकरित्या जमीन असेल आणि असे जमीन मालक एकच अंतिम भूखंड मिळविण्यास इच्छुक असतील तर त्याना उक्त अधिनियमाच्या कलम ६५ नुसार एकच अंतिम भूखंड मिळणेसाठी शक्यतो १५ दिवसांच्या आत संमती देण्यास विनंती आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उप-कलम (३) च्या तरतुदींनुसार, नगररचना परीयोजना क्रमांक १० मध्ये अंतर्भूत करण्यात येणारे क्षेत्र (गुलाबी रंगाच्या सीमेने) दर्शविणाऱ्या नकाशाची प्रत जनतेच्या तपासणीसाठी मुख्य नियोजनकार (नैना), ८ वा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

विषयांकित परियोजनेचे सिमाक्षेत्र दर्शविणारा नकाशा संबधित गावांच्या ग्रामपंचायत कार्यालयात तपासणीसाठी उपलब्ध राहतील. सदर सूचना व नकाशा सिडकोच्या संकेतस्थळ *http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx.* येथे सुद्धा उपलब्ध राहतील.

नगररचना परीयोजना क्रमांक १० मध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत :—

**उत्तरेला –** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर, नगररचना परीयोजना क्रमांक ७ ची हद्द आणि जुना मुंबई-पुणे महामार्ग (रा.म.-४८)

**पूर्वेला –** नगररचना परीयोजना क्रमांक ९ ची हद्द.

**दक्षिणेला –** कोन गावाची हद्द आणि नगररचना परीयोजना क्रमांक ११ ची हद्द

**पश्चिमेला –** पनवेल-रोहा रेल्वे मार्गाची हद्द आणि कुडावे गावाची हद्द

सिडको संचालक मंडळाच्या आदेशानुसार,

**नोंदणीकृत कार्यालय :**
निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१,
दिनांक २९ डिसेंबर २०२२.

**रविंद्रकुमार म. मानकर,**
मुख्य नियोजनकार (नैना).

**CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.**

*NOTICE*

UNDER SECTION 60(2) OF THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966

**Town Planning Scheme No. 10**

No. CIDCO/NAINA/CP/TPS-10/2022/597

WHEREAS, the Government of Maharashtra in exercise of powers conferred under clause (b) of sub-section (*1*) of the Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") declared by Notification, No. TPS -1712/475/CR-98/12/ UD-12, dated 10th January 2013 and subsequent amendment (hereinafter referred to as "the said Notification") City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as "the Corporation") as Special Planning Authority (hereinafter referred to as "the SPA") for Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) (hereinafter referred to as "said notified area") as specified therein ;

And whereas, the Government of Maharashtra *vide* Notification No. TPS-1215/245/CR-332/2016/ SM/UD-12, dated 27th April 2017 has Sanctioned the Interim Development Plan (IDP) for the 23 villages of NAINA, and also *vide* Notification No.TPS.1215/245/C.R.332/16/ EP/UD-12, dated 1st March 2019 has sanctioned the Excluded Parts of the IDP under sub-section (*1*) of Section 31of the said Act ;

And whereas, the Government of Maharashtra *vide* Notification No. TPS-1717/ MIS-2750/ C.R.91/ 2019/ UD-12, dated 16th September 2019 has sanctioned the Development Plan (DP) for 151 villages of NAINA and also *vide* Notification No. TPS. 1221/1041/C.R.71/21/UD-12, dated 24th June 2022 has partly sanctioned the Excluded Parts of the DP under Section 31(*1*) of the said Act ;

And whereas, the Board of CIDCO *vide* Resolution No 12307, dated 3rd March 2020, had declared its intention under sub-section (*1*) of section 60 of the said Act, for making Town Planning Scheme No. 10 (hereinafter referred to as "TPS-10") at part villages of Shivkar, Chikhale, Kolkhe, Kon and Derawali of Taluka Panvel, District Raigad and a notice about declaration of making Scheme no.10 has been published in the Extraordinary *Maharashtra Government Official Gazette* (part-II) dated 18th March 2020 as well as in the daily newspapers "The Free Press Journal" and "Aaple Mahanager" in English and Marathi dated 2nd April 2020 under sub-section (*2*) of section 60 of the said Act ;

And whereas, in accordance with the amended provisions of section 148(A) of the said Act, *vide* Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Act, 2020 (Maharashtra Act No. XIX of 2020), in computing the period, in relation to any Development Plan, Regional Plan or Scheme under the provisions of Chapter II, III, IV and V of the said Act, the period of periods during which any action could not be completed under the said chapters, due to enforcement of any Guidelines or lockdown measures by the Government of India or the state Government, as the case may be, to prevent the spread of any pandemic or epidemic or disaster situation arising in the Country or State shall be excluded ;

And whereas, the prescribed time limit is in existence on excluding the period of lockdown declared due to spread of COVID-19 virus in the State of Maharashtra, by the Government from dated 23rd March 2020;

And whereas, VC&MD, CIDCO in accordance with the powers delegated by CIDCO Board *vide* Resolution No. 12551, dated 2nd April 2022, had accorded approval for inclusion of additional area in declared TPS-10 under section 62 of the said Act and declared its intention for making Town Planning Scheme at additional area at part villages of Kolkhe, Kolkhe Peth, Kon, Derawali and Palaspe of Taluka Panvel, District Raigad under sub-section (*1*) of section 60 of the Act and published a notice about declaration of making TPS-10 with additional area in the *Maharashtra Government official Gazette* (part-II) dated 25th-31st August 2022 as well as in the daily newspapers "The Free Press Journal" and "Dainik Kille Raigad" in English and Marathi dated 2nd September 2022 under sub-section (*2*) of Section 60 of the said Act;

And whereas, all the orders that are currently in force for the imposition of restriction related to COVID-19 under Disaster Management Act, 2005 are withdrawn and no longer be in force from 1st April 2022 by order of Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation dated 31st March 2022;

And whereas, both the declarations of intention published in *Maharashtra Government official gazette vide* No. CIDCO/ NAINA/ CP/ TPS-10/ 2020, dated 18th March 2020 and *vide* CIDCO/ NAINA/ CP/ TPS-10/ 2022/ 515, dated 25th-31st August 2022 to prepare TPS-10 have lapsed and any such lapse in declaration does not debar the Planning Authority from making fresh declaration any time in respect of the same area as per sub-section (*2*) of section 61 of the said Act.

Now therefore, Board of CIDCO acknowledge the insufficient time left to prepare Draft scheme and accorded approval for fresh declaration of Town Planning Scheme No. 10 with same scheme boundary under sub-section (*2*) of with section 61 of the said Act, *vide* Resolution No. 12629, dated 9th December 2022, and at the same time declared its intention for making Town Planning Scheme No.10 at part villages of Shivkar, Chikhale, Kolkhe, Kolkhe Peth, Kon, Derawali and Palaspe of Taluka Panvel, District Raigad under sub-section (*1*) of section 60 of the said Act.

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*2*) of the section 60 of the said Act, the Corporation hereby publishes its declaration of making Town Planning Scheme No. 10 at part area of all villages bounded by PINK border as shown on declaration plan, namely; Shivkar, Chikhale, Kolkhe, Kolkhe Peth, Kon, Derawali and Palaspe of Taluka Panvel, District Raigad.

Land owners who are having valid building permission obtained from Competent Authority, falling within the boundary of proposed TPS-10 (shown by PINK border on plan) of part villages Shivkar, Chikhale, Kolkhe, Kolkhe Peth, Kon, Derawali and Palaspe are requested to submit details of the same to NAINA office preferably within 15 days. Participants having land ownership jointly or severally willing to obtain a single final plot are requested to submit their consent under section 65 of the said Act for providing single plot preferably within 15 days.

In accordance with the provisions of sub-section (*3*) of section 60 of the said Act, a copy of the declaration along with the plan showing the boundary of Town Planning Scheme No. 10 (shown by PINK border) is kept open for inspection by the public in the office of Chief Planner (NAINA), 8th Floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD Belapur, Navi Mumbai-400 614, during office hours.

Copies of the plan showing the area to be included in scheme are also kept for inspection in the Grampanchayat offices of the villages included in the said Town Planning Scheme. Copy of the notice and plans are also available on CIDCO's website *http://cidco.maharashtra.gov.in/ NAINA.aspx.*

The area included in the Town Planning Scheme No. 10 is bounded as stated below :—

| | |
|---|---|
| *On the North*— | Mumbai-Pune expressway, boundary of scheme no. 7 and Old Mumbai Pune highway NH-48 |
| *On the East*— | boundary of TP scheme No. 9 |
| *On the South*— | boundary of village Kon and boundary of TP scheme No. 11. |
| *On the West*— | boundary of Panvel - Roha Railway line and boundary of village Kudave |

By the order of Board of Directors of the Corporation,

*Regd. Office :*
Nirmal, 2nd floor, Nariman point, Mumbai 400 021,
Dated the 29th December 2022.

RAVINDRAKUMAR M. MANKAR,
Chief Planner (NAINA).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.